# पिंपरी चिंचवड महानगरपालिका , पिंपरी – ४११ ०१८.

## पदव्युत्तर संस्था,यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

दुरध्वनी क्र. ०२०६७३३२२०२ E-mail - ycmh@pcmcindia.gov.in


-: जाहीरात :-

**थेट मुलाखत ( WALK IN INTERVIEW )**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पदव्युत्तर संस्था,यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात रुग्णालयीन कामकाजाकरीता पात्र व इच्छुक उमेदवारांची ११ महिने कालावधीसाठी पुर्णत: तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर विविध विभागाकरिता आवश्यकतेनुसार तज्ञ वैदयकिय अधिकारी ( कन्सल्टंट) या पदावर नियुक्ती करण्यासाठी दिनांक : १२/१२/ २०२४ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० तसेच त्यापुढील प्रत्येक सोमवारी उपलब्ध जागानुसार खालील पदासाठी मार्किंग पॅटर्ननुसार थेट मुलाखती (walk in interview ) आयोजीत करण्यात आलेल्या आहेत. तरी पात्र व इच्छुक तज्ञ वैदयकिय अधिका-यांनी मुलाखतीस उपस्थीत रहावे.

| अ.क्र | विभागाचे नाव | पद / शैक्षणिक अर्हता | पद संख्या | मानधन दरमहा | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | मेडीसीन विभाग | इंटेनसिव्हीस्ट ( कन्सल्टंट )<br>• M.D. (Medicine) / M.D.(Anaesthesia) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>• पदव्युत्तर पदवी पश्चात १०० किंवा त्यापेक्षा जास्त खाटांचे रुग्णालयात १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक. | २ | १,२५,०००/- | १- पद - खुला<br>१- पद – अ.जा.,त्यानंतर अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), इ.मा.व., साशैमाप्र, भ.ज.(क), आदुघ, भ.ज.(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने. |
| २ | भुलतज्ञ विभाग | भुलतज्ञ (कन्सल्टंट)<br>• M.D. (Anaesthesia) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>• पदव्युत्तर पदवी पश्चात १०० किंवा त्यापेक्षा जास्त खाटांचे रुग्णालयात १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक. | २ | १,२५,०००/- | |
| ३ | क्ष किरण विभाग | रेडिओलॉजिष्ट (कन्सल्टंट)<br>• M.D/DNB(Radiology) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>• पदव्युत्तर पदवी पश्चात १०० किंवा त्यापेक्षा जास्त खाटांचे रुग्णालयात १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक. | २ | १,२५,०००/- | |
| ४ | न्युरोसर्जरी विभाग | न्युरोसर्जन (कन्सल्टंट)<br>• MCH. /DNB Neurosurgery ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>• पदव्युत्तर पदवी पश्चात १०० किंवा त्यापेक्षा जास्त खाटांचे रुग्णालयात १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक. | १ | १,२५,०००/- | खुला |
| ५ | दंतरोग विभाग | Oral Surgery (कन्सल्टंट)<br>• MDS Oral Surgery ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>• पदव्युत्तर पदवी पश्चात १०० किंवा त्यापेक्षा जास्त खाटांचे रुग्णालयात १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक. | १ | १,२५,०००/- | खुला |

टिप - उमेदवारांच्या उपलब्धतेनुसार कामाचा अनुभव व आरक्षणाची अट शिथिल करणेत येईल.

**अर्ज स्विकारणे विषयक माहिती**

- walk in interview साठी उपस्थिती व अर्ज स्विकारण्याचे ठिकाण - यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, पदव्युत्तर संस्था, दुसरा मजला, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, संत तुकारामनगर पिंपरी-१८
- walk in interview साठी उपस्थीतीची वेळ, दिनांक - १२ / १२ /२०२४ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यत तसेच उमेदवार उपलब्ध न झालेस तेथुन पुढे दर सोमवारी walk in interview द्वारे सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यत राहिल.

अटी – शर्ती

१) सदर जाहिरातीद्वारे विहीत मुल्यांकन पध्दतीने प्रारुप गुणवत्ता यादी तयार करुन आवश्यकतेप्रमाणे म्हणजेच महापालिकेला गरज भासेल त्याप्रमाणे गुणवत्ता यादीमधुन मानधन द्वारे आवश्यक संख्येने पदांच्या नियुक्त्या करणेत येतील.

२) जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदाकरिता कामकाज कालावधी ११ महिने राहिल.

३) सदरची नेमणुक तात्पुरत्या स्वरुपातील असल्याने उमेदवारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुसार करण्यात येणार आहे.

४) वय वर्ष ५७ वर्षे पुर्ण असणा-या उमेदवारांनी उपरोक्त नमुद पदासाठी अर्ज करु नयेत असे अर्ज अपात्र समजणेत येतील.

५) विहीत शैक्षणिक पात्रता व अनुभव आवश्यक राहील.

६) सदर पदाच्या कंत्राटी नेमणुका पुर्व नियोजित तारखेस walk in interview द्वारे करण्यात येतील.

७) उमेदवारांची पात्रता व अनुभवाच्या मुळ कागदपत्रासह एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मुळ कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीचा एक संच घेवुन मुलाखतीस हजर रहाणे आवश्यक आहे. सदर अर्ज नमुना व मुल्यांकन पध्दत नमुना मनपा वेबसाईटवर उपलब्ध आहे.

८) उमेदवारांच्या जन्म तारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची सांक्षाकिंत प्रत अथवा जन्मतारखेची नोंद असलेली शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

९) उमेदवार मागसवर्गीय असलेल्या जातीचा स्पष्ट उल्लेख करुन कोणकोणत्या प्रवर्गात मोडत आहे, याचा उल्लेख करावा.

१०) अर्जदार महिला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. ( शासनमान्य )

११) विहित पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज व पुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, गुणपत्रक,जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती न जोडलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.

१२) मुलाखतीसाठी येणा-या उमेदवारांना स्वर्चाने मुलाखतीसाठी उपस्थीत रहावे लागेल.

१३) वरिल पदे ही संपुर्णपणे कंत्राटी स्वरुपाची असल्याने या पदावर कायम स्वरुपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही.

१४) वरिल पदासाठी कामाचे स्वरुप ठरविण्याचे सर्वस्वी अधिकार पदव्युत्तर संस्था,यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय प्रमुखांना राहतील.

१५) सदर पदांना नमुद केलेनुसार रुग्णालयाच्या सोईनुसार सेवा देणे बंधनकारक असेल तथापी पदांची कामकाजाची वेळ निश्चित करण्याचे अधिकार पदव्युत्तर संस्था,यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय विभाग प्रमुख तसेच रुग्णालय प्रमुख यांचे असतील.

१६) अपात्र ठरविलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. बोलविलेल्या उमेदवारांस नियुक्ती देण्याबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी स्वत:कडे राखुन ठेवलेले आहेत या बाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१७) महापालिकेच्या अस्थापनेवरील नियमीत कर्मचा-याच्या लाभदायी योजना मानधन तज्ञ वैदयकीय अधिकारी (कन्सल्टंट) यांना लागु होणार नाही.

१८) निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर, अर्जदार अर्हता धारण न करणारा आढळल्यास,गैरवर्तन करताना आढळल्यास, सेवा देण्यास टाळाटाळ केल्यास, रुग्णालयाची वेळ न पाळल्यास व दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास कामकाज/नियुक्ती आदेश रद्द करणेत येईल.

१९) रुग्णालयीन वेळेनुसार थम्ब इम्प्रेशन करणे बंधनकारक राहील. रुग्णालयीन वेळेत थम्ब मध्ये उशीर झाल्यास मनपा नियमानुसार नियमाधिन कारवाई करणेत येईल. तसेच रुग्णालयीन कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने तातडीच्या परिस्थितीत रुग्णालयात उपस्थीत रहावे लागेल.

२०) मानधनावरील नियुक्त केलेल्या पदाचे काम सोडताना किमान एक महिना अगोदर लेखी पुर्व सुचना कार्यालयास देणे बंधनकारक राहिल अन्यथा एक महिन्याचे मानधन मनपा कोषागारात जमा करणे बंधनकारक राहिल. राजीनामा सादर न करता परस्पर काम सोडुन गेल्यास मानधन कपात करण्यात येईल.

२१) नियुक्ती संदर्भात अंतिम अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी १८. यांना राहतील आणि निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार त्यांनी राखुन ठेवले आहेत.

२२) सदर जाहिरात पिंपरी चिंचवड महानगरपालिका www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असुन सदरहु भरती प्रक्रिया संदर्भात अधिक माहिती नमुद संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

जाहिरात क्रमांक -
दिनांक -०५/१२/२०२४
जा.क्र. वायसीएमएच/११/कावि/ ९१४२ /२०२४ दिनांक: ०५/१२/२०२४

(१६)

# उमेदवाराने करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रति,
मा.आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.

विषय– यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामध्ये तात्पुरत्या स्वरूपातमानधनावरील ------------------------------------------------या पदासाठी अर्ज.

संदर्भ- वायसीएमएच/ /कावि/ /२०२४ दिनांक. / /२०२४

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी श्री/श्रीम.-------------------------------------------- हंगामी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात दरमहा एकत्रित मानधनावर ---------------------------------------- या पदासाठी जाहिरातीमधील आवश्यक ती अर्हता धारण करीत असुन या पदासाठी निवड होण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

आडनाव स्वत:चे नाव वडिल/पतिचे

१) संपुर्ण नाव– ---------------------------------------------------------------------------

२) पत्रव्यवहारचा पत्ता- -----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

३) जन्म दिनांक - / / मोबाईल क्र. –

४) लिंग - पुरुष ☐ स्त्री- ☐ तृतीयपंथी- ☐

ईमेल आयडी -

५) जात - प्रवर्ग –

६) महाराष्ट्र मेडीकल/इंडीयन मेडीकल कौन्सिल/नर्सेस कौन्सिल कडील नोंदणी क्र. ----------- ---------------------- दिनांक / /

७) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल –

| अ.क्र. | शैक्षणिक | संस्था विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

८) तांत्रिक व इतर अर्हता तपशिल - ------------------------------------------------------

अनुभवाचा तपशिल –

| अ.क्र. | संस्थेचे नाव | संस्थेचा पत्ता दुरध्वनीसह | पद | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |

| एकुण अनुभव - | वर्ष - | महिने- | दिवस- |
|---|---|---|---|

वरील नमुद केलेला तपशिल खरा व बरोबर असुन त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/ करते की वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास या माहितीच्या आधारे नोकरीवरुन कमी करण्यास मी पात्र राहीन, तसेच माझ्याविरुध्द कोणतीही कायदेशिर कारवाई केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

अर्जदाराची सही

स्थळ – पिंपरी-१८ (नाव- श्री./श्रीम- ---------------------------------)

दिनांक- / /२०२४.

सहपत्रे– अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

(ज्या क्रमाने जोडलेल्या आहेत त्याप्रमाणे लिहणे)

१) ------------------------------------------------

२) ------------------------------------------------

३) ------------------------------------------------

४) ------------------------------------------------